मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई या कार्यालयातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असलेल्या लघुलेखक (उच्च श्रेणी) १ पद व लिपिक टंकलेखक ३ पदे अशा एकूण ४ पदांच्या सेवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंतच्या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र.मुसामु-१६२५/२०४/प्र.क्र.२९/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १७ नोव्हेंबर, २०२६.

वाचा :- १) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क., दि.२७ एप्रिल, २०२२.
२) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२८२४/प्र.क्र.७२/का.८, दि.२७ नोव्हेंबर, २०२४.
३) मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र./आस्था/२९/२०२४-२०२५, दि.११ फेब्रुवारी, २०२५.
४) उपसमितीच्या दि.२२ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त, वित्त विभाग पत्र क्र.पदनि-२०२६/प्र.क्र.८१(E१८४११५६)/आपुक, दि.०७ ऑक्टोबर, २०२६.

प्रस्तावना :-

विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२७.११.२०२४ अन्वये कार्यासन-८ च्या अधिपत्याखालील १३ सरकारी वकील कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई या कार्यालयाकरिता विविध संवर्गात नियमित २५ पदे मंजूर असून गट-ड संवर्गातील ६ पदांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कार्यालयातील लघुलेखक (उच्च श्रेणी) संवर्गाचे १ पद व लिपिक टंकलेखक संवर्गाची ३ पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत. सदर कार्यालयाचे कामकाज मा.न्यायालयाशी संबंधित असून सर्व रिक्त पदे भरणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कार्यालयातील लघुलेखक (उच्च श्रेणी) १ पद व लिपिक टंकलेखक ३ पदे अशा एकूण ४ पदांच्या सेवा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंतच्या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याची विनंती संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी केली आहे. त्यानुषंगाने, सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला. वित्त विभागाने उपरोक्त प्रस्ताव वित्त विभाग, शासन निर्णय दि.०९ जून, २०१७ अन्वये गठित उपसमितीसमोर सादर करण्यास मान्यता दिली. उपसमितीच्या दि.२२ सप्टेंबर, २०२६ रोजी पार पडलेल्या बैठकीत सदर कार्यालयातील रिक्त असलेल्या लघुलेखक (उ.श्रे.) १ व लिपिक टंकलेखक ३ अशा एकूण ४ पदांच्या सेवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित पदे उपलब्ध होईपर्यंतच्या कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर सदर कार्यालयातील लघुलेखक (उ.श्रे.) १ व लिपिक टंकलेखक ३ अशा एकूण ४ पदांच्या सेवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित पदे उपलब्ध होईपर्यंतच्या कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

उपसमितीने दिलेल्या मान्यतेनुसार, मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई या कार्यालयातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असलेल्या लघुलेखक (उच्च श्रेणी) १ पद व लिपिक टंकलेखक ३ पदे अशा एकूण ४ पदांच्या सेवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंतच्या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेताना वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दि.२७.०४.२०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच, बाह्ययंत्रणेद्वारे सेवा उपलब्ध करुन घेताना प्रचलित कायद्याचा भंग होणार नाही याची काळजी कार्यालय प्रमुखांनी घ्यावी. नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर बाह्ययंत्रणेद्वारे घेतलेल्या सेवा तात्काळ समाप्त करणे बंधनकारक राहिल. नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देता येणार नाही.

३. यावर होणारा खर्च मागणी क्र. जे-०१, लेखाशिर्ष २०१४, न्यायदान, ११४, विधि सल्लागार व समुपदेशी (००)(०१) विधि सल्लागार व समुपदेशी, (शहर अधिकारी)(दत्तमत)(अनिवार्य) "१०-कंत्राटी सेवा" (सांकेतांक क्र.२०१४ ०२९९) खाली खर्ची टाकून तो मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. वित्त विभाग, शासन निर्णय दि.०९.०६.२०१७ अन्वये गठित, अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग या उपसमितीच्या दि.२२ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून, त्याचा सांकेतांक क्र. २०२६१११७१६५५२६६३१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWATI SURESH LOHAR

Digitally signed by SWATI SURESH LOHAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department, 2.5.4.20=EAEF1FAF1FB5262EC7B0737903120DFA387867F017650E284F3E90868F26D12D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AB72B06178SAE0359686D1C8A0DDB0F52744A155BE1924D6AB3706E1DE7E60EC, cn=SWATI SURESH LOHAR
Date: 2026.11.17 16:56:28 +05'30'

(स्वा.सु. लोहार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
३) सह सचिव (कार्या-८), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
५) अधीक्षक, मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
६) कक्ष अधिकारी (आपुक/व्यय-५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कक्ष अधिकारी (कार्या-२३), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड नस्ती/ कार्या-८